अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड




## लष्कर परिसरात विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर :** उत्तर सदर बाजार परिसरातील लष्कर येथे राहणाऱ्या एका ३५ वर्षीय विवाहितेने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास घडली. वंदना शामसुंदर कावील (वय ३५ रा. लष्कर, उ.सदर बाजार सोलापूर) असे मयत झालेल्या विवाहितेचे नाव आहे. रात्री साडेबारा वाजेच्या सुमारास तिने राहत्या घरातील छताच्या लाकडी वाशाला साडीने गळफास घेतली होती. घरातील लोकांनी तिला फासातून सोडवून पहाटे शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ती उपचारापूर्वी मयत झाली. या घटनेची नोंद सदर बझार पोलिसात झाली असून यामध्ये कारण समजले नाही.

www.surajyadigital.com

। सोमवार, दि. १३ जानेवारी २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : १०६ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# देवाभाऊंनी रणशिंग फुंकले महाविजयाचे फर्मान सोडले



## शिर्डीतील भाजपच्या राज्य अधिवेशनात केली भीमप्रतिज्ञा

**सोलापूर/विशेष प्रतिनिधी**

**भारतीय जनता पक्षाचे राज्यस्तरीय अधिवेशन रविवारी शिर्डी येथे पार पडले.विधानसभेच्या निवडणुकीत मिळालेल्या अभूतपूर्व यशाविषयी आनंद व्यक्त करतानाच राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्था अर्थात लोकल बॉडीच्या निवडणुकीची रणनीती यावेळी निश्चित करण्यात आली. हे अधिवेशन आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्वाचे मानले जाते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आक्रमक शैलीत भाषण करताना पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना चेतना दिली. या अधिवेशनातून त्यांनी आगामी महापालिकेच्या निवडणुकीचे रणशिंग फुंकले.या निवडणुकीत विधानसभेप्रमाणे परत एकदा महाविजय मिळवण्याची भीमप्रतिज्ञा त्यांनी केली.**

आपल्याला विकासाची कामे करायची आहेत. भारतीय जनता पक्षाला विधानसभेत मिळालेला महाविजय जनसामान्यांच्या जीवनात परिवर्तन आणण्यासाठी आहे. तसेच एक पारदर्शी आणि प्रामाणिकतेतून चालणारे सरकार अशी प्रतिमा आपल्या सरकारची आणि त्या सरकारच्या पाठिमागे उभी असलेल्या संघटनेची राहिली पाहिजे. जर अशा दोन्ही प्रतिमा आपण तयार केल्या निश्चित आपल्याला वारंवार मोठा विजय मिळेल'', असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

''येणाऱ्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. माझा असा अंदाज आहे की पुढच्या तीन-चार महिन्यांत अर्थात सर्वोच्च न्यायालयात शेवटच्या टप्प्यात असलेला तो निर्णय झाला तर तीन-चार महिन्यांत या निवडणुका होतील. या निवडणुकींची तयारी आपल्याला करायची आहे. तसा महाविजय महायुतीने विधानसभेच्या निवडणुकीत मिळवला तसाच महाविजय आपल्याला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मिळवाचा आहे. त्यासाठी आपण सज्ज राहावे'',अशा शब्दात त्यांनी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना चेतना दिली.

### विरोधकांची घेतली फिरकी..

''साईबाबांनी आपल्याला श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र दिला. श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र आपल्या भाजपात महत्वाचा आहे. राष्ट्र प्रथम म्हणजे श्रद्धा आणि नंतर सबुरी म्हणजे आपण. हा मंत्र आपण सर्वजण पाळत असतो. आपल्याला माहिती आहे की, ज्यांना हा मंत्र समजला ते सर्व यशस्वी झाले. पण श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र ज्यांना समजला नाही, त्यांची हालत काय झाली? हे आपण विधानसभेच्या निवडणुकीत पाहिले'', असे सांगून त्यांनी विरोधकांची फिरकी घेतली.

### मनातून नापास झालो, पण

महाराष्ट्राच्या जनतेने आपल्याला एक नाही तर तीन वेळा भाजपाला १०० पेक्षा जास्त जागा दिल्या. ३० वर्षांच्या महाराष्ट्राच्या इतिहासात १०० पेक्षा जास्त जागा मिळवणारा आपला पक्ष आहे. लोकसभेच्या निवडणुकीत ४८ पैकी १७ जागा आपल्या निवडून आल्या. जेमतेम ३५ टक्के मार्क घेऊन आपण काठावर पास झालो होतो.मनात नापास झाल्याची भावना येत होती मात्र, त्यानंतर आपण विधानसभेला २८८ पैकी २३७ जागा आपण जिंकल्या आणि ८२ टक्के गुण मिळवले. भाजपाने तर ८९ टक्के गुण मिळवले आणि आपला पक्ष मेरिटमध्ये पास झाला'', असे त्यांनी सांगताच अधिवेशनातील वातावरण एकदम भावनिक झाले.

### व्होट जिहादचा 'पार्ट टू' सुरू

फडणवीस यांनी यावेळी एक गंभीर चिंता व्यक्त केली. महाविकास आघाडीने निवडणुकीत अराजकतावादी शक्तींचा वापर केल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत या शक्तींना बरोबर घेऊन देशात अन् राज्यात अराजकता पसरविण्याचे काम केले. पुढचे युद्ध घुसखोर बांगलादेशी आणि अराजकतावादी शक्तींविरोधात तीव्र करणार असल्याचा एल्गार त्यांनी केला. गेल्या सहा महिन्यांत राष्ट्रीय विचार संघटनांनी एकत्रित येऊन, राष्ट्रवादाचे पुन्हा रोपण केले. या अराजकतावादी शक्तींना निवडणुकीत पराभूत केले असले, तरी त्यांच्या कारवाया थांबलेल्या नाहीत. आपल्या समोर आव्हान आहे. बांगलादेशी घुसखोर सापडत आहे. ते कागदपत्र बनवून मतदार याद्यात घुसलेत. मालेगाव, अमरावतीमधील अंजणगावमध्ये जन्माचे प्रमाणपत्र मिळत आहेत,याकडे त्यांनी राज्याचे लक्ष वेधले. देशात, महाराष्ट्रात एकही घुसखोर राहू देता कामा नये. व्होट जिहादचा पार्ट-टू, सुरू आहे. या घुसखोरांना बाहेर काढण्याचं आव्हान आहे. अराजकतावादी ताकदीविरोधी लढाई घट्ट करावी लागेल,असा इशारा त्यांनी दिला.

## शिंगोली जवळ मोटारीच्या धडकेने दुचाकी वरील तरुण ठार



**सोलापूर/प्रतिनिधी**

वेगाने जाणारी मोटर पाठीमागून धडकल्याने दुचाकी वरील तरुण गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात मंगळवेढा रोडवरील शिंगोली गावाजवळ रविवारी दुपारी ३ वाजेच्या सुमारास घडला.

तुषार अनिल पवार (वय २२ रा.राजेश कोठे नगर,सोलापूर) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. तो रविवारी दुपारी तीन वाजेच्या सुमारास कामती येथून सोलापूरच्या दिशेने निघाला होता. शिंगोली गावातील पेट्रोल पंपाजवळ त्यावेळी पाठीमागून एमएच०९-जीएम-००६ या क्रमांकाचे मोटार धडकल्याने तो गंभीर जखमी झाला होता. त्याला म्बुलन्स मधून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.



**सोलापूर : ग्रामदैवत श्रीसिद्धेश्वर यात्रेस रविवारपासून प्रारंभ झाला. शहरातील ६८ लिंगांना तैलाभिषेक करण्यात आला. तत्पूर्वी हिरेहब्बू परिवार, डॉ.मल्लिकार्जून शिवाचार्य महास्वामी व मान्यवरांच्या उपस्थितीत हब्बू यांच्या वाड्यात मानाच्या नंदीध्वजाची पूजा करण्यात आली.**

## बीएसएफ अलर्ट, घुसखोरीचा मोठा कट उधळला

**नवी दिल्ली :** बांगलादेशात काही दिवसांपूर्वी शेख हसीना यांचे सरकार सत्तेतून गेले. नवीन मोहम्मद यांच्या नेतृत्वाखाली नवीन सरकार स्थापन झाले, तेव्हापासून भारतात बेकायदेशीरपणे घुसखोरी करण्याचे प्रयत्न सतत सुरू आहेत. दरम्यान, भारत-बांगलादेश सीमेवर तैनात असलेल्या सैनिकांना मोठे यश मिळाले आहे. सीमा सुरक्षा दलाच्या दक्षिण बंगाल फ्रंटियरच्या विविध बटालियनच्या सतर्क सैनिकांनी बंगालच्या उत्तर २४ परगणा आणि नादिया जिल्ह्यांमधील भारत-बांगलादेश सीमेवर वेगवेगळ्या कारवाईत बेकायदेशीर घुसखोरींचे मोठे प्रयत्न उधळून लावले आणि एकूण २४ बांगलादेशी आणि दोन रोहिंग्यांना अटक केली.

या प्रकरणाबाबत बीएसएफने रविवारी एक निवेदन प्रसिद्ध केले आहे. त्यात म्हटले आहे की, हे सर्व घुसखोर वेगवेगळ्या सीमावर्ती भागातून बेकायदेशीरपणे भारतीय हद्दीत प्रवेश करण्याचा प्रयत करत होते. याशिवाय, जवानांनी सीमेवर तस्करींचे अनेक प्रयत्न



हाणून पाडले बीएसएफच्या अधिकाऱ्याने सांगितले की, शनिवारी जवानांनी उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय सीमेवरून २० बांगलादेशी आणि दोन रोहिंग्या आणि नादिया सीमेवरून चार बांगलादेशींना बेकायदेशीरपणे भारतीय हद्दीत प्रवेश करण्याचा प्रयत्न करत असताना पकडले आणि परत हाकलून लावले. घुसखोर घरकाम आणि मजुरीच्या कामासाठी मुंबई, बंगळुरू आणि हैदराबादला जात होते. बांगलादेशकडून घुसखोरींचे सतत प्रयत्न होत आहेत, पण सतर्क सैनिक त्यांचे मनसुबे हाणून पाडत आहेत, असे अधिकाऱ्याने सांगितले.

## पेनूर येथे ५५ लाखांची फसवणूक

**मोहोळ :** द्राक्ष पिकाची परस्पर विक्री करून ५५ लाखाची फसवणूक केल्याप्रकरणी मारुती विश्वंभर गवळी (रा. पेनूर ता.मोहोळ) याच्याविरुद्ध मोहोळच्या पोलिसांनी नुकताच गुन्हा दाखल केला आहे. यासंदर्भात आरोपींचे भाऊ यशवंत विश्वंभर गवळी (वय ५० रा.पेनुर) यांनी नुकतीच पोलिसात फिर्याद दाखल केली. फिर्यादी यशवंत गवळी यांची द्राक्ष बाग आहे. आरोपी मारुती गवळी हा सदर शेतजमीन ही स्वतःची मालकीची आहे असे भासवून त्यांच्या परवानगी शिवाय सन २०२१ ते २०२३ या कालावधीत द्राक्ष पिकाची परस्पर विक्री केली.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



**त्यांच्या बोलण्यातून वेगळाच वास येतोय!**

# वाल्मिक कराडची पंढरपूरच्या शेतकऱ्यांना कोट्यवधीची टोपी; ऊसतोड यंत्र अनुदान फसवणूक प्रकरणी १९ जणांचे नोंदवले जबाब

**पंढरपूर/प्रतिनिधी**

**संतोष देशमुख हत्या प्रकरणात चर्चेत आलेला वाल्मिक कराड हाच ऊसतोड यंत्र अनुदान मुख्य आरोपी असल्याचं आणि सर्वात जास्त आरोप असल्याचं सध्या चित्र समोर येत आहे. दरम्यान, वाल्मिक कराड याने ऊस हार्वेस्टिंग करणाऱ्या मशीन मालकांना ११ कोटी कोटी २० लाखाची टोपी घातल्याचा प्रकार उघड झाल्यानंतर आता यामध्ये वाल्मिक कराड आणि धनंजय मुंडे या दोघांच्याही अडचणी वाढण्याची शक्यता आहे. याबाबत शनिवार (ता.११) रात्री उशिरा पंढरपूर परिसरातील फसवणूक झालेल्या १९ यंत्र मालक शेतकऱ्यांचे जबाब पोलिसांनी नोंदवून घेतले आहेत.**

### फसवणुकीची व्याप्ती मोठी, मुख्यमंत्र्यांनी वरिष्ठ पातळीवरून करावा तपास

आता या सर्व शेतकऱ्यांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी अर्ज दाखल केला असून राज्यातील विविध भागातील हे तक्रारदार असल्याने आता राज्यात अनेक ठिकाणी हे तक्रारी अर्ज दाखल होण्यास सुरुवात होईल. या प्रकाराची व्याप्ती मोठी असून या त अनेक जण सामील असल्याने याचा वरिष्ठ पातळीवरून मुख्यमंत्र्यांनी तपास करावा, अशी मागणी या शेतकऱ्यांची आहे. या शेतकऱ्यांनी आमदार सुरेश धस आणि मनोज जरांगे यांच्याही कानावर हा सर्व प्रकार घातला असून आम्हा गोरगरीब शेतकऱ्यांना न्याय मिळावा, अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

दरम्यान, आता या सर्व प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी होणार असून या ११ कोटी २० लाखाची फसवणूक झालेल्या सर्व मशीनधारकांना त्यांच्या जवळील पुरावे सादर करण्यास सांगितले आहे. यातील तथ्य तपासून पुढील दोन दिवसात वाल्मिक कराड, जितेंद्र पालवे आणि नामदेव सानप यांच्यावर गुन्हा दाखल होण्याची शक्यता आहे.



**पंढरपूर : ऊसतोड यंत्र अनुदानाच्या पार्श्वभूमीवर, वाल्मिक कराड यांना देण्यासाठी जमा करण्यात आलेल्या ११ कोटी २० लाखांची रोकड मोजून नेताना त्याचा निकटवर्तीय.**

### श्रीकांत नागणे, दिलीप नागणे यांच्यासह १९ जणांचे जबाब

पालघर येथील एका हॉटेलमध्ये पैसे मोजून देतानाचे फोटो आणि मुंडे यांच्या भेटीचे व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर वायरल झाले आहेत. यातील एका फोटोत जितेंद्र पालवे हा पैसे मोजून घेताना दिसत असल्याचा दावा तक्रारदारांचा आहे. या तक्रारदारांकडे प्रत्येक नोटीचे नंबर आणि व्हिडिओ देखील असून अनेकांनी कर्ज काढून आणि सावकाराच्या माध्यमातून हे पैसे उभा केले असल्याचे त्यांनी सांगितले आहे. दरम्यान पंढरपूर ग्रामीण पोलीस स्टेशनचे निरीक्षक शिरीष हुंबे यांनी श्रीकांत नागणे, दिलीप नागणे यांच्यासह १९ जणांचे जबाब काल रात्री उशिरा नोंदवले आहेत. या सर्वांचे तक्रारी अर्ज देखील पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल झाले असून येत्या दोन दिवसात सर्व पुरावे सादर करण्याची सूचना पोलिसांनी या शेतकऱ्यांना दिलेली आहे. सर्व पुरावे आणि तथ्य समोर आल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे सह्याद्री अतिथिगृहावर झालेल्या भेटीचे व्हिडिओ आणि फोटो सध्या व्हायरल होत असून पैसे देतानाचा एक फोटोही समोर आला आहे. ही हार्वेस्टिंग मशीन साधारण एक कोटी रुपयाची असून यासाठी पूर्वी अनुदान मिळत होते. मात्र नंतरच्या काळात हे अनुदान बंद होऊ नये कराड आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या शेतकऱ्यांची मोठी आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप शेतकरी करीत आहेत.

▸▸ नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची पोलिसांत धाव

▸▸ रात्री उशीरापर्यंत जबाब घेण्याचे काम

### १४० जणांकडून प्रत्येकी आठ लाख रुपये घेतल्याची तक्रार

ऊस हार्वेस्टिंग करणाऱ्या राज्यातील जवळपास १४० शेतकरी मशीन धारकांना ३६ लाखाचे अनुदान मिळवून देतो म्हणून वाल्मिक कराड आणि त्यांच्या सहकार्याने प्रत्येकी आठ लाख रुपये देण्यास सांगितले होते. तात्कालीन कृषी मंत्री धनंजय मुंडे हे आपले निकटवर्ती असून आम्ही तुम्हाला हे अनुदान मिळवून देतो, असे सांगत या सर्व १४० जणांकडून प्रत्येकी आठ लाख रुपये घेतल्याची तक्रार या शेतकऱ्यांची आहे. यासाठी १४ सप्टेंबर २०२४ रोजी धनंजय मुंडे यांची वाल्मिक कराड यांनी सह्याद्री अतिथीगृहावर भेट घडवून आणल्याचा गोप्यस्फोटही या तक्रारदारांनी केला आहे. यावेळी मुंडेंनीही आश्वासन दिल्याचा दावा या शेतकऱ्यांचा आहे.

### अजित पवारांच्या कानावर गोष्ट, तक्रारी दाखल करण्याचे नुकसानग्रस्तांना आवाहन

तत्कालीन कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या आडून वाल्मिक कराड यांनी ऊसतोड यंत्रणांना प्रत्येकी ३६ लाख अनुदान देतो म्हणून राज्यातील १४० शेतकऱ्यांकडून११ कोटी २० लाख उकळल्याचे प्रकरण प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कानावर रविवार (ता.१२) घातल्यानंतर याप्रकरणी संबंधित शेतकऱ्यांनी तक्रारी दाखल कराव्यात, असे त्यांनी सांगितले.